सोमवार, दि. ३ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २१२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अॅण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# संतुलित अर्थसंकल्प मांडण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला चहापान कार्यक्रम संपन्न



- आर्थिक शिस्त पाळतानाच कोणतीही फ्लॅगशिप योजना बंद करणार नाही
- छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल चुकीचे बोलणाऱ्यांवर कारवाई होणारच
- राज्यात यंदा सर्वाधिक सोयाबीन खरेदी
- १०० दिवस उपक्रमाचे त्रयस्थ संस्थेद्वारे मूल्यमापन करणार
- अधिवेशनात संविधान व पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्यावर विशेष चर्चा होणार

**मुंबई । प्रतिनिधी** - विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अतिशय चांगले व संतुलित अर्थसंकल्प मांडण्याचा आमचा प्रयत्न आहे. आर्थिक शिस्त पाळताना भांडवली खर्चावर परिणाम होणार नाही, याची काळजी घेत आहोत. हे करत असताना कोणतीही फ्लॅगशिप योजना बंद करणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहापान कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी मंत्रिमंडळातील सदस्य संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, नव्या सरकारचे हे पहिलेच अर्थसंकल्पीय अधिवेशन असून हे अधिवेशन चार आठवड्याचे असणार आहे. या अधिवेशनात दोन विषयांवर महत्त्वाच्या चर्चा होणार आहेत. ८ मार्चला महिला दिनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्मशताब्दीनिमित्ताने विशेष चर्चा होणार आहे. तसेच भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त दोन दिवस संविधानावर चर्चा होणार आहे. या अधिवेशनात पाच विधेयकांवर चर्चा होईल. विधिमंडळात सर्व विषयांवर सविस्तर सकारात्मक चर्चा करण्यात येणार आहे. विधिमंडळाच्या नवीन सदस्यांना चर्चेत सहभागी करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

आरोग्य विभागाच्या एका फाईलवर स्थिगिती दिल्याच्या बातमीसंदर्भात मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, अशा प्रकारची कोणतीही फाईल माझ्याकडे आली नाही व मी स्थगिती दिलेली नाही. आरोग्य विभागाच्या संबंधित विषयात केंद्र शासनाला सुचविलेल्या कामातील ९ टक्के निधी हा भांडवली खर्चावर खर्च करणार होते. मात्र, केंद्र शासनाने भांडवली खर्चावर ५ टक्के निधी खर्च करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्राधान्यक्रम ठरवून संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी, सचिवांनी प्राधान्य ठरविण्यासाठी माहिती मागविली आहे. त्यामुळे ही फाईल माझ्याकडे आली नाही. तसेच वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासंदर्भातही इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रातील दर कमी आहेत. इतर राज्यात या नंबर प्लेटची किंमत ही जीएसटी व ती प्लेट बसविण्याचा खर्च वगळून आहे तर महाराष्ट्रातील दर हे जीएसटी व प्लेट बसविण्याच्या खर्चासह आहे. गेल्या पंधरा वर्षातील सोयाबीनच्या सर्वाधिक खरेदीपेक्षा दहापट खरेदी यंदाच्या वर्षी सोयाबीनची झाली आहे. खरेदी केलेले सोयाबीन ठेवण्यास गोदामातही जागा उपलब्ध नाही. त्यामुळे माध्यमांनी एखादी बातमी प्रसिद्ध करताना शासनाचीही बाजू मांडल्यास त्यातून होणारे गैरसमज पसरणार नाहीत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे आराध्य दैवत आहे. त्यांच्याबद्दल कोणीही चुकीचे बोलले तर खपवून घेणार नाही, त्यांच्यावर कारवाई होणारच असेही मुख्यमंत्री महोदयांनी यावेळी सांगितले. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे असून त्यांच्याबद्दल आम्हाला पुरेपूर माहिती आहे. त्यांनी दाखविलेल्या मार्गानेच आम्ही काम करत आहोत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्य शासनाने राबविलेल्या १०० दिवसांच्या कामास मोठा प्रतिसाद मिळाला आहे. यासंदर्भात मी, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी मिळून आढावा घेतला. अनेक विभागांनी चांगली कामे केली आहेत. अनेक कार्यालये स्वच्छ झाली असून रेकॉर्ड रुम तयार झाले आहेत. दूरदृश्य प्रणालीद्वारे नुकत्याच घेतलेल्या बैठकीस राज्यातील सुमारे ७ हजार अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. १०० दिवस पूर्ण झाल्यानंतर या उपक्रमाचे केंद्र शासनाच्या क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडिया या त्रयस्थ संस्थेद्वारे मूल्यमापन केले जाणार आहे. त्यातून उत्तम काम करणाऱ्यांना निवडण्यात येणार आहे. तसेच नेमून दिलेल्या कामांसाठी बेंचमार्क ठरविण्यात येणार असून त्या खाली कामगिरी असणाऱ्यांची माहिती गोळा करण्यात येणार असल्याचेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

**सर्वसामान्यांसाठी व राज्य पुढे नेण्यासाठी काम करत आहोत - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्य शासन हे सर्वसामान्यांच्या विकासासाठी काम करत आहे. विकास कामांबरोबरच कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. सर्वसामान्यांना चांगले दिवस आणण्यासाठी व राज्याला पुढे नेण्यासाठी आम्ही काम करत आहोत. राज्याच्या विकासाची वाटचाल दुप्पट तर वेग चौपट होईल. याचे प्रतिबिंब येणाऱ्या अर्थसंकल्पात दिसेल. या अधिवेशनात विरोधी पक्षांनी कामकाजात सहभाग घेऊन नागरिकांची, मतदारसंघाची प्रश्ने मांडावीत. त्यांच्या **पान २ वर**

युवा आदर्श

### महा दुर्घटना ...

मोठ मोठे होर्डिंग्ज
का झुळूक येतापडे
विचीत्र डले कोडे
ती महा दुर्घटना घडे
मुळा पर्यंत चौकशी
बाहेर येतीलं लफडे
माहिती नाही कोण
गुन्ह्यामधे या सापडे
श्रध्दांजली वहा त्या
निर्वर्तले जेजे बापडे
खैर नाही जखमींची
रे निघाले पार पापडे
जाहिरातीच्या नादात
रचली सरण लाकडे
मृतांच्या आठवणीवर
सुगंधी अत्तरे चोपडे
पुरावे नको मिळाया
जाळून टाका चोपडे
वाचव वेळीचं त्यांना
उतरती सगळे कपडे
अपघातग्रस्ताने सांग
काय केले हो वाकडे
विस्थापनांचे बा सारे
प्रयत्न होणारं तोकडे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# फिरकीपटू ठरले स्टार; भारताचा दणदणीत विजय

**नवी दिल्ली -** श्रेयस अय्यरची ७९ धावांची खेळी, वरूण चक्रवर्तीचे ५ विकेट्स व फिरकीपटूंची भेदक गोलंदाजी या जोरावर भारताने न्यूझीलंडला नमवत ४४ धावांनी मोठा विजय नोंदवला. भारताच्या फिरकीपटू चौकडीने ९ विकेट्स घेत किवीच्या धावांना वेसण घातलं. या विजयासह भारताने गुणतालिकेत पहिलं स्थान गाठलं आहे. टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीत गट टप्प्यातील तिन्ही सामने जिंकत उपांत्य फेरीत पोहोचला आहे. यासह भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीतील उपांत्य फेरीचा सामना ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळवला जाणार आहे.

दुबई इंटरनॅशनल स्टेडियमवर रविवारी २ मार्च रोजी खेळल्या गेलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या शेवटच्या गट सामन्याकडे सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या. उपांत्य फेरीतील ४ संघ आधीच ठरले होते पण आता कोणता संघ कोणत्या संघाविरूद्ध खेळणार हे निश्चित होणं बाकी होत आणि ते भारत-न्यूझीलंड सामन्याच्या निकालावर ठरणार होते. यासह आता उपांत्य फेरीचे संघ ठरले असून भारत वि. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड वि. दक्षिण आफ्रिका हे संघ असणार आहेत.

भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीतील तिसरी नाणेफेक गमावली पण सलग तिसरा सामना मात्र जिंकला आहे. नाणेफेक गमावत भारतीय संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला होता आणि भारताची सुरूवात खूपच खराब झाली. भारताने ३० धावांमध्ये ३ विकेट गमावले होते. यानंतर श्रेयस अय्यरने अक्षर पटेलच्या साथीने ९८ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. श्रेयस अय्यरने ७९ धावांची तर अक्षर पटेलने ४२ धावांची खेळी केली. न्यूझीलंडकरून वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीने ५ विकेट्स घेत भारताला जास्त धावा करण्याची संधी दिली नाही.

भारताने दिलेले २५० धावांचे लक्ष्य न्यूझीलंड सहज गाठेल असं वाटत होते. पण भारताने मोठी खेळी करत ४ फिरकीपटू खेळवले आणि किवी संघ फिरकीसमोर फेल ठरले. न्यूझीलंडचा फक्त केन विल्यमसन १२० चेंडूत ७ चौकारांसह ८१ धावा करत बाद झालाय याशिवाय कोणताही फलंदाज ३० धावांचा टप्पा गाठू शकला नाही. भारताच्या फिरकी गोलंदाजांनी किवी संघाला एकेका धावेसाठी मेहनत करायला लावली. अखेरीस भारताने न्यूझीलंडला सर्वबाद करत मोठा विजय नोंदवला.

भारताकडून वरूण चक्रवर्तीने १० षटकांत ४२ धावा देत ५ विकेट्स घेतल्या. तर अक्षर, जडेजा, हार्दिकने प्रत्येकी १-१ विकेट तर कुलदीपने २ विकेट्स घेतल्या. आपला पहिला चॅम्पियन्स ट्रॉफी सामना खेळत असलेल्या वरूणने भेदक गोलंदाजी करत सामनावीराचा पुरस्कारही पटकावला.






मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली असून या दरम्यान समाज बांधव उपवास ठेवतात. उपवास सोडण्यासाठी पेंड खजूर बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. (छाया - जावेद तंबोली)

शिक्षक संघटना आक्रमक

# ‘भ्रष्ट शिक्षणाधिकारी हटाव’

## आंदोलनासह गुन्हा दाखल करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी** - शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी गुन्हा दाखल केल्यानंतर शिक्षक संघटना आक्रमक झाल्या आहेत. मंगळवार (दि ४) रोजी शिक्षण उपसंचालक छ. संभाजीनगर येथे भ्रष्ट शिक्षणाधिकारी हटाव आंदोलन करण्यात येणार आहे. त्याचबरोबरच संघटनेचे जिल्हाउपाध्यक्ष जगन वाघमोडे यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार देत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. जिल्हापरिषद जालना शिक्षणाधिकारी (माध्य) यांनी जगन वाघमोडे यांच्या विरोधात खोटा गुन्हा दाखल केला असून या घटनेचा मराठवाडा शिक्षक संघ निषेध करत असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे. त्याचबरोबरच भ्रष्ट शिक्षणाधिकारी हटाव आंदोलन सायंकाळी ४ ते ६ दरम्यान करण्यात येणार असून यात प्रामुख्याने शिक्षणाधिकारी यांच्या कारभाराची चौकशी करण्यात येऊन त्यांच्या शिक्षकांना धमकावणे, अर्वाच्च भाषा वापरणे, तक्रार निवारण बैठका न घेणे, विनाकारण शाळेचे वेतन थांबवणे, नियमबाह्य वैयक्तिक मान्यता देणे माहिती लपवणे, आर्थिक फायदा पाहणे आदी मुद्यांचा समावेश आहे.

# संपादकीय

## वन्यजीवांचे संरक्षण आपले कर्तव्य

आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा केला जातो. वन्यजीवांची शिकार थांबवून वन्यजीव प्रजातींचे संवर्धन करणे हा या दिना मागिल मुख्य उद्देश आहे. १९७० च्या सुमाराला वन्यजीवांची शिकार, त्यांची तस्करी याचे प्रमाण वाढू लागले होते. हे प्रमाण इतके वाढले की त्यापैकी बरेचसे वन्यजीव कायमचे नष्ट होतात की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. याबाबत जागृती करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने ( युनो ) वन्यजीव दिवस साजरा करण्याचे ठरवले. यादिवशी वन्यजीवांचे रक्षण त्यांचे संवर्धन आणि निसर्ग साखळीतील त्यांचे महत्व आदी विषयांवर जनजागृतीचे कार्यक्रम केले जातात. नामशेष होण्याच्या धोका असलेल्या वन्य सृष्टीच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंधन आणणारा कायदा ३ मार्च १९७३ रोजी ८० देशांनी मान्य केला म्हणून या दिवसाला महत्व आहे. वन्यजीवांची शिकार तसेच त्यांच्या आणि दुर्मिळ वनस्पतींचा चोरटा व्यापार ही मोठी समस्या बनली आहे. केवळ भारतातच नाही तर जगभरात ही मोठी समस्या बनली आहे. एकिकडे जंगले कमी होत आहे तर दुसरीकडे शिकार आणि तस्करीमुळे वन्यजीव नामशेष होत आहे. निसर्गाच्या समृद्ध परंपरेचा केंद्रबिंदू म्हणजे वन्यजीव. बंगालचे वाघ, आशियातील एकशिंगी गेंडे, भारतीय मोर आणि अशा इतर वैशिष्ट्यपूर्ण वन्यजीवांचे सुरक्षित वसतिस्थान म्हणजे जंगल. पण आता याच जंगलावर मानवाने अतिक्रमण केल्याने या वन्यजीवांच्या अस्तित्वाचा प्रश्न निमर्ण झाला आहे. हत्ती, गेंडा आणि वाघ हे जंगलातील मुख्य वन्यजीव आहेत. निसर्ग साखळीत या वन्यजीवांचे महत्व अनन्यसाधारण आहे पण हस्तिदंत, गेंड्याचे शिंग आणि वाघाच्या शरीरातील विविध अवयव यांच्या चोरट्या व्यापाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. जगभरात या व्यापारातून दरवर्षी ३५ हजार ते ७० हजार कोटी रुपयांची उलाढाल होत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. गेल्या ४० वर्षात जगभरातील अर्धे वन्यजीवन धोक्यात आले आहे. वन्यजीवांचा अधिवास धोक्यात येणे, वन्यजीवांची शिकार त्यांची तस्करी अशा अनेक कारणाने वन्यजीवांची संख्या कमालीची घटली आहे. हस्तिदंतासाठी आजवर १ लाख आफ्रिकन हत्ती शिकार झाले आहेत. खवले मांजर हा जगातील सर्वाधिक मारला जाणारा सस्तन प्राणी ठरला आहे. मागील दहा वर्षात गेंड्याच्या शिकारीत कैक पटीने वाढ झाली आहे. वन्यजीवांच्या तस्करीमुळे कायदा आणि सुरक्षा व्यवस्था, गुन्हेगारी टोळ्यांचा निधी यासारखे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहे. वन्यजीवांची शिकार तसेच त्यांच्या आणि दुर्मिळ वनस्पतींचा चोरटा व्यापार स्थानिकांच्या मदतीशिवाय होणे शक्य नाही. त्यामुळे असे होऊ नये यासाठी त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. निसर्गाच्या साखळीतील प्रत्येक घटक किड्यांपासून ते हत्तीपर्यंत पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी महत्वाचा आहे. ही बाब सर्वांनी ध्यानात घेतली पाहिजे. जगातील एकूण लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्या तरुण आहे. विशेष म्हणजे भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या तरुण आहे. म्हणून वन्यजीव संरक्षण व संवर्धन करण्यात तरुणांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे. तरुणांना वन आणि वन्यजीवांचे महत्व समजावून सांगावे त्यासाठी शाळा कॉलेजमध्ये जाऊन त्यांचे प्रबोधन करावे. तरुणांच्या हातात त्या त्या देशाचे भविष्यच नसून जगभरातील सर्व वन्यजीवांच भविष्य त्यांच्याच हाती आहे. सरकारनेही वन्यजीवांची शिकार करणारे व त्यांची तस्करी करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. जंगलतोड होऊ नये यासाठी उपाय योजावेत. वन्यजीवांचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी नसून कर्तव्य आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

## संतुलित अर्थसंकल्प ...

सर्व प्रश्नांना उत्तरे देण्यात येतील.

**प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्याची तयारी - उपमुख्यमंत्री अजित पवार**

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, अर्थसंकल्पीय अधिवेशनात सर्वसामान्यांचे प्रश्न सुटावेत, या दृष्टीने काम काज करण्यात येणार आहे. या अधिवेशनात राज्यपाल महोदयांचे अभिभाषण तसेच पुरवणी मागण्यांवर चर्चा होईल. तसेच दोन महत्त्वाच्या विषयांवर विशेष चर्चा होणार आहे. प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्याची तयारी राज्य शासनाची आहे.

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहापान कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री, राज्यमंत्री तसेच आमदार उपस्थित होते.

# विद्युत क्रांती; भविष्य उजळवणारी ऊर्जा नव चक्राची गती!

ऊर्जा ही कोणत्याही प्रदेशाच्या विकासाची मुख्य धुरा आहे. जळगाव जिल्हा आता केवळ केळी उत्पादनासाठीच नव्हे, तर ऊर्जाक्षेत्रातील क्रांतिकारी बदलांसाठीही ओळखला जात आहे. प्रगत तंत्रज्ञान, नव्या ऊर्जा प्रकल्पांचे नियोजन, वीज वितरण सुधारणा आणि सौरऊर्जेच्या झपाट्याने वाढणाऱ्या प्रकल्पांमुळे जळगाव भविष्यात महाराष्ट्राच्या ऊर्जाधारी जिल्ह्यांपैकी एक ठरणार आहे. त्यासंदर्भात घेतलेला आढावा!!

दीपनगर भुसावळ थर्मल पॉवर प्लांट - विद्युत उत्पादनाचा मजबूत कणा

जळगाव जिल्ह्यातील वीज निर्मितीचा कणा म्हणजे दीपनगर, भुसावळ थर्मल पॉवर प्लांट. हे राज्यातील प्रमुख थर्मल पावर (तापीय) वीज प्रकल्पांपैकी एक असून, येथे विद्यमान १२१० मेगावॅट क्षमतेचे वीज उत्पादन सुरू आहे.

**सध्याची उत्पादन क्षमता:**

दोन युनिट्स प्रत्येकी ५०० मेगावॅट

एक युनिट २१० मेगावॅट

**वाढीव क्षमता:**

लवकरच ६६० मेगावॅट क्षमतेचे चौथे युनिट कार्यान्वित होणार आहे.

सर्व परवानग्या आणि चाचण्या पूर्ण होताच उत्पादन सुरू होईल. हा प्रकल्प केवळ जिल्ह्यापुरता मर्यादित नसून, संपूर्ण महाराष्ट्राच्या ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**जळगाव - सौरऊर्जेच्या दिशेने मोठे पाऊल!**

जळगावचे ऊन हे पूर्ण राज्यात किती 'ताप'ट आहे ही सांगण्याची गरज नाही. आता या त्रासदायक तापमानाचा फायदा घेतला जातो आहे. जिल्हा प्रशासनाने यात आघाडी घेतली असून जिल्ह्यातील अनेक जागा सौरऊर्जा प्रकल्पाला उपलब्ध करून दिल्या आहेत.

सौरऊर्जा हे भविष्यातील स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेचे सर्वात प्रभावी साधन आहे. जळगावमध्ये मोठ्या प्रमाणावर सौरऊर्जा निर्मितीला चालना मिळत असून, भविष्यात हा जिल्हा सौरऊर्जा हब म्हणून विकसित होण्याच्या मार्गावर आहे.

३९०० एकर जमीन सौर प्रकल्पांसाठी उपलब्ध करून दिली जाणार असून त्यातून ९०० मेगावॅट नवीन सौरऊर्जा निर्मिती केली जाईल एवढी क्षमता आहे. ३२८ मेगावॅट प्रकल्प सध्या बांधकामाधीन आहे तर २० मेगावॅट आधीच कार्यान्वित झाला आहे. कृषी आणि घरगुती पातळीवर सौर पंप व छप्परावरील सौर पॅनेल द्वारे अतिरिक्त ऊर्जा निर्मिती होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार सौरऊर्जा वापर प्रोत्साहन योजनेला जिल्ह्यात मोठा प्रतिसाद मिळत असून विद्युत प्रसारण आणि वितरणात मोठ्या सुधारणा करण्यात येत असून त्यामुळे वीज उत्पादनाबरोबरच तिचे प्रसारण आणि वितरण सुयोग्य असणे आवश्यक आहे. म्हणूनच जळगाव जिल्ह्यात महत्त्वपूर्ण सुधारणा पुढील प्रमाणे राबवल्या जात आहेत.

१८१ उपस्थानके - एकूण क्षमता १७९० मेगावॅट=९ RDSS योजनेअंतर्गत सुधारणा:

८०० नवीन ट्रान्सफॉर्मर्स बसवले जात आहेत.

कृषी क्षेत्रासाठी फीडर विभाजनाचे काम प्रगतीपथावर.

४३ नवीन किंवा अद्ययावत उपस्थानके - ३०० मेगावॅट अतिरिक्त क्षमता निर्माण होणार.

वन नेशन, वन ग्रिड - अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करणारी योजना

यामुळे जळगाव जिल्ह्याचा वीज पुरवठा अधिक सक्षम आणि स्थिर होणार आहे.

**वीज चोरी आणि अनधिकृत टॅपिंग - मोठे नुकसान!**

वीज चोरीमुळे जळगाव जिल्ह्यात दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे.

४०,००० वितरण ट्रान्सफॉर्मर्सपैकी २०% ट्रान्सफॉर्मर्स ओव्हरलोड होतात. गेल्या काही वर्षांत १४०० ट्रान्सफॉर्मर्स जळाले, ज्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले.

प्रशासनाची नागरिकांना विनंती: आपल्या भागातील अवैध वीज जोडण्यांची माहिती प्रशासनाला द्या. वीज चोरी रोखण्यासाठी सहकार्य करा आणि प्रामाणिक वीज वापरास चालना द्या.

**विद्युत पुरवठा आणि मागणी - भविष्याचा वेध**

सध्या जळगाव जिल्ह्यातील वीज मागणी १०७४ मेगावॅट आहे. उन्हाळ्यात ही मागणी १४०८ मेगावॅट पर्यंत वाढते. नियोजित सुधारणा आणि नवीन प्रकल्पांमुळे ६८२ मेगावॅट अतिरिक्त क्षमता निर्माण होईल. यामुळे जळगाव जिल्हा ऊर्जा निर्यात करणाऱ्या प्रदेशांपैकी एक बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे!

**नवी संधी - उद्योग, गुंतवणूक आणि विकास!**

ऊर्जा हा उद्योग आणि व्यवसायांच्या वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. जळगाव जिल्ह्यातील वीज उपलब्धता वाढल्यामुळे औद्योगिक क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे. औद्योगिक क्षेत्रासाठी मुबलक वीज उपलब्ध होणार असून कृषी उत्पादन प्रक्रिया आणि नवीन तंत्रज्ञानाला चालना मिळेल. स्थानिक व्यवसायांना मोठा वेग - नवे उद्योग, नव्या संधी निर्माण होणार आहेत.

ऊर्जासंपन्न जळगाव - ही ओळख भविष्यातील औद्योगिक, आर्थिक आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी निर्णायक ठरणार आहे.

**जिल्हाधिकारी यांचे नागरिकांना आवाहन**

वीज चोरी आणि अनधिकृत टॅपिंग रोखण्यासाठी सहकार्य करा. नवीन ऊर्जेच्या संधींचा लाभ घ्या - व्यवसाय व उद्योग वाढवा. शाश्वत, स्वच्छ आणि सक्षम ऊर्जा व्यवस्थेसाठी योगदान द्या असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री आणि जिल्ह्याचे लोकप्रतिनिधी जिल्हा वार्षिक नियोजनच्या बैठकांमध्ये आणि दिशा समितीच्या आढावा बैठकीच्या माध्यमातून या सर्व प्रकल्पांचे नियमित परीक्षण करत आहेत.

**जळगाव - ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दिशेने!**

जळगाव जिल्हा आता केवळ कृषी आणि व्यापारासाठीच ओळखला जाणार नाही, तर ऊर्जा उत्पादन आणि व्यवस्थापनातील यशस्वी प्रयोगशील जिल्हा म्हणूनही पुढे येणार आहे. थर्मल आणि सौरऊर्जेच्या सहाय्याने, तसेच वितरण आणि प्रसारण सुधारणा यामुळे हा जिल्हा ऊर्जास्वयंपूर्णतेच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. जळगाव जिल्हावासियांनो प्रगतीत आपले योगदान द्या आणि उज्ज्वल भविष्याच्या दिशेने वाटचाल करा..!! जिल्ह्यातील विकासाचे नवे पर्व तुमच्या सर्वांचे सहकार्याने सुरु होणार आहे. चल संकल्प करू या, जळगावचा विकास करू या!!

**- युवराज पाटील**
**जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव**

# विद्यार्थ्यांनो बिनधास्त परीक्षा द्या!



सध्या दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. काहींच्या परीक्षा मध्यात आल्या आहेत. दोन ते तीन पेपर होऊन गेलेले आहेत. मात्र कुठून तरी निराशा जनक बातम्या येत राहतात. अशावेळी विद्यार्थ्यांना सांगणे आहे की, विद्यार्थ्यांनो दहावी,बारावी इतर आयुष्याची सुरुवात आहे.या परीक्षा म्हणजे तुमच्या आयुष्याची शेवटची परीक्षा नाही. या परीक्षेला कोणतीही निराशा, दुःख, नैराश्य न बाळगता पुढे जा एखाद्या वर्षी एखादी परीक्षा देता आली नाही किंवा अपयश आले म्हणजे सर्वच संपत नाही जीवन हे सुरूच असते.

अनेक वेळा काही कारणास्तव काही विद्यार्थ्यांचे पेपर बरोबर जात नाहीत. किंवा अपेक्षित त्याला लिहिता येत नाही. काही ठिकाणी अपवादात्मक परिस्थितीमध्ये एखादा पेपरही देता येत नाही. अशावेळी निराश होऊ नये. एखादी परीक्षा तुमच्या यशा अपयशाचे सूत्र ठरू शकत नाही आज ज्यांना यशस्वी म्हणून तुम्ही बघता त्यांनाही कधी काळी दहावी बारावी मध्ये अपयश आले होते. त्यामुळे या परीक्षेशिवाय मोठी लढाई आयुष्यात असून भयमुक्त व तणाव मुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जाणे हेच महत्त्वपूर्ण आहे.

**अपयश ही यशाची पहिली पायरी**

सध्या दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. ही वेळ विद्यार्थ्यांसाठी तणावाची असते, अनेक ठिकाणी पालकांसाठीही पालकांनी बनवलेली ही परिस्थिती असते. अनेक प्रश्न डोक्यात असतात - पेपर कठीण जाईल का? चांगले गुण मिळतील का? अपयश आल्यास काय करायचे? मात्र, हे लक्षात ठेवले पाहिजे की अपयश हा शेवट नसतो, तर यशाकडे नेणारा एक टप्पा असतो.

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील गुंटूर गावच्या आकाश शिंदेची कथा आजच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. बारावीच्या परीक्षेत तो तब्बल चार वेळा नापास झाला. त्याला अनेकांनी हिणवले, जवळच्याही मंडळीने त्याच्यावर टीका केली. मात्र, त्याने हार मानली नाही. अष्टपैलू मेहनत, सातत्य आणि चिकाटीच्या जोरावर त्याने आठ वर्षे संघर्ष केला आणि अखेर चझडउ परीक्षेत यश मिळवून महसूल सहाय्यक अधिकारी बनला.

आकाशची ही कहाणी स्पष्ट सांगते की, एक-दोन अपयशांनी आयुष्य थांबत नाही. अपयश आपल्याला अधिक परिपक्व आणि यशासाठी सज्ज करते. त्यामुळे एक-दोन पेपर कठीण गेल्याने निराश होण्याची गरज नाही. अपयश हे यशाचे पहिले पाऊल असते.

**अपयशातून शिकण्याचे धडे**

अपयश आले तर त्यावर रडत बसण्यापेक्षा त्यातून शिकले पाहिजे. थॉमस एडिसन यांनी बल्ब शोधण्यासाठी हजारो वेळा अपयश अनुभवले. जेव्हा लोकांनी त्यांना विचारले, तुम्ही हजार वेळा अपयशी झालात? तेव्हा ते हसून म्हणाले, मी हजार वेळा अपयशी झालो नाही, तर मी हजार मार्ग शोधले जे चुकीचे होते.

त्याचप्रमाणे, बारावी किंवा दहावीच्या परीक्षेत अपयश आले तर त्याचा अर्थ तुमची क्षमता कमी आहे असे नाही, तर तुमची तयारी अजून सुधारण्याची संधी आहे. त्यामुळे आई - वडील, नातेवाईकांनी, स्नेहींनी तुमच्या भल्यापोटी काही बोलले असेल तर ते मनाला लावून घेऊ नका. जितके इनपुट तुम्ही तयार केले आहे. तितके आऊटपुट दिले जाईल. काही गोष्टी आपल्या हातात नसतात, त्यामुळे या परीक्षा देताना आलेल्या आकस्मिक गोष्टींना मनाला न लावून घेता पुढे चालणे सुरू ठेवावे.

**विद्यार्थ्यांसाठी काही महत्त्वाचे संदेश**

अपयशाने खचून जाऊ नका - अपयश म्हणजे पूर्णविराम नसून स्वल्पविराम आहे.

सकारात्मक मानसिकता ठेवा - मी करू शकतो हा विचार कायम ठेवा.

स्वतःच्या चुका ओळखा आणि सुधारणा करा - चुका ओळखून पुढच्या वेळी योग्य रणनीती आखा.

स्मार्ट स्टडी करा - पाठांतर न करता संकल्पनांची नीट समजूत करून अभ्यास करा.

निरोगी दिनक्रम ठेवा - योग्य आहार, पुरेशी झोप आणि मानसिक स्थिरता याला महत्त्व द्या.

योग्य मार्गदर्शन घ्या - शिक्षक, पालक आणि समुपदेशक यांच्याकडून मदत घ्या.

**धैर्य आणि आत्मविश्वास महत्त्वाचा**

आयुष्यात न थांबणाऱ्या प्रवाहासारखे रहा. काहीही झाले तरी प्रवास सुरू ठेवा. जेव्हा तुम्ही हार मानता, तेव्हा प्रत्यक्षात तुमच्या यशाच्या संधीही संपतात. पण जर तुम्ही प्रयत्न करत राहिलात, तर तुमच्या यशाची शक्यता वाढत जाते.

**समुपदेशनाचा लाभ घ्या**

सध्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने समुपदेशन सेवा उपलब्ध करून दिली आहे. जर तुम्हाला एखादा पेपर कठीण गेला असेल, किंवा तुम्हाला नैराश्य वाटत असेल, तर घाबरून न जाता समुपदेशन केंद्रांशी संपर्क साधा. दरवर्षी परीक्षा येतात. संधी पुन्हा मिळते. त्यामुळे तणाव टाळा आणि सकारात्मक दृष्टीकोन ठेवा.

**अंतिम विचार: यशाची गुरुकिल्ली**

एक यशस्वी व्यक्ती आणि एक अपयशी व्यक्ती यांच्यात फक्त एकच फरक असतो - जो व्यक्ती अयशस्वी होतो, तो अपयश स्वीकारूनही जिद्द ठेऊन पुढे चालतो. आणि पुन्हा पुन्हा प्रयत्न करतो!त्यामुळे यशस्वी होतो. त्यामुळे प्रयत्न करणारा आज ना उद्या यशस्वी होणारच आहे.

आजचा पराभव उद्याच्या विजयासाठी आवश्यक असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी भयमुक्त होऊन परीक्षांना सामोरे जावे, अपयशाने खचून जाऊ नये आणि आत्मविश्वासाने पुढे वाटचाल करावी. यश तुमच्या हाती आहे - फक्त प्रयत्न सुरू ठेवा !

तणावमुक्तीसाठी समुपदेशकांची नियुक्ती

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी व बारावी परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. लातूर विभागीय मंडळस्तरावर १० वी साठी ०२३८२-२५१६३३ तर १२ वीसाठी ०२३८२-२५१७३३ हा हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. मनात कोणताही ताणतणाव आल्यास या क्रमांकावर आपल्याला दूरध्वनी करता येईल.

**१० वी साठी हेल्पलाईन क्रमांक**

या हेल्पलाईनसाठी नियुक्त केलेले नावे व भ्रमणध्वनी पुढीलप्रमाणे आहेत. कुंभार ए.आर (सहाय्यक सचिव) मो.नं. ९४०५०७७९९१, उच्च माध्यमिक बारावी साठी कारसेकर जे. एस. (व.अ.) मो.नं. ९८२२८२३७८०, डाळींबे एम.यु. (प.लि.) मो.नं. ९४२३७७७७८९, जानकर एच.एस. (व.लि.) मो.नं. ९७६४४०९३१८ आहेत.

माध्यमिक (दहावी) साठी मो.नं. ९४२०४३६४८२, ९४०५४८६४५५, ७६२०१६६३५४ हे भ्रमणध्वनी आहेत. विद्यार्थी, पालक व शाळाप्रमुखांनी आपल्या अडीअडचणी विषयी दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क सकाळी ८ ते सायंकाळी ८ यावेळेत साधावा. तर १२ वी साठी ९३७१२६१५००, ९८६०९१२८९८,. ९८६०२८६८५७, ९७६७७२२०७१ असे मोबाईल नंबर असून त्याचा पालकांनी विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.

**प्रवीण टाके,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**नांदेड**

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील बदल, त्यानुसार येणाऱ्या काळातील मूल्यांकन पद्धती समजून घ्यावी - प्रा. राजेंद्र कांबळे

**जाफराबाद | प्रतिनिधी -** येथे शिक्षक सक्षमीकरण, शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण याचा तिसरा टप्पा सुरू आहे. या टप्प्याला जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉक्टर राजेंद्र कांबळे यांनी भेट दिली. याप्रसंगी त्यांनी प्रशिक्षणार्थी शिक्षक यांच्याशी सुसंवाद साधताना, त्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून होणारे बदल, येणाऱ्या अभ्यासक्रमांमधून येणारे बदल, विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी आपण तयार झालं पाहिजे, त्या बदलातील संकल्पना, समजावून घेऊन विद्यार्थ्यांना समृद्ध करण्यासाठी या प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये दरवर्षी, शिक्षकांना ५० तासांचे प्रशिक्षण दिल्या जाणार आहे. त्यासाठी सुद्धा शिक्षकांनी आता तयार राहायला पाहिजे. येणाऱ्या धोरणामध्ये इयत्ता सहावी पासूनच व्यावसायिक शिक्षणाचा भर दिलेला असून, भविष्यात विद्यार्थ्याला शिक्षणाचे कौशल्य व्यवसायाची कौशल्य आत्मसात करण्यासाठी शिक्षकांनी लर्निंग आऊट कमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे त्यासाठी या प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. शिक्षणामधील समग्र प्रतीपत्रक, शिक्षणामध्ये येणाऱ्या मूल्यांकनासाठी स्कोप नावाचं प्रणाली, शिक्षकांनी समजावून घेऊन त्यानुसार आपल्या शिक्षण प्रणालीमध्ये शिक्षणासाठी तयार राहिलं पाहिजे याचाही वापर त्यांनी आपल्या मार्गदर्शन पर भाषणामध्ये केला. यात सर्वप्रथम डॉक्टर राजेंद्र कांबळे यांचे स्वागत राज्य तज्ञ उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. त्यांच्यासोबत असलेले जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिव्याख्याता तथा जाफराबाद तालुक्याचे समन्वयक भरत सूर्यवंशी यांचाही स्वागत दत्ता गवळी यांनी केले. त्यांच्यासोबत आलेले जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिव्याख्याता सय्यद सर यांचे स्वागत सुलभक काशिनाथ उखर्डे यांनी केले. या कार्यक्रमाला उपस्थितांमध्ये तज्ञ सुलभक माधव शिंदे, तज्ञ सुलभक भास्कर शिंदे, गटसाधन केंद्राचे गंगाराम आल्हाट, गटसाधन केंद्राचे चव्हाण सर, तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, व आभार प्रदर्शन राज्य तज्ञ प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव यांनी केले.





# शिवसेना भांडुपच्यावतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा



**मुंबई । प्रतिनिधी -** मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने शिवसेना भांडुप विभाग प्रभाग क्र ११५च्या वतीने व संदीप भाई जळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी उद्योजक व शिवसैनिक श्री यतीन सावंत यांच्या संकल्पनेतून 'गौरव मराठी साहित्यिकांचा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमा अंतर्गत, विभागातील साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी, कवी व लेखक डॉ. राम कदम, श्री .सुरेश पाटील सर, सौ. शितल ताई भुवड, श्री प्रदीप कासुर्डे सर,सौ स्वामिनी काराने ,श्री लव क्षिरसागर आणि पत्रकार श्री पंकजकुमार पाटील व मयूर राणे तसेच गडकिल्ले व संवर्धन यूट्यूब ब्लॉगर श्री प्रथमेश राणे यांचा शिवसेना पक्षाचे भांडुप विधानसभा आमदार मा. श्री अशोक पाटील साहेब यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी मान्यवरांनी मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व, मराठी संस्कृती याबद्दल आपापली मते व्यक्त करून मराठी भाषेची जपवणूक व तीला समृद्ध करण्याचे काम प्रत्येक मराठी भाषिकाचे असल्याचे सांगितले.

सदर कार्यक्रमाला महिला विभाग प्रमुख सौ राजश्री मांदवीलकर, भांडुप विधानसभा महिला अध्यक्षा श्रीमती नेहा पाटकर, भांडुप विधानसभा संघटक श्री उदय पाडावे, शाखा क्र ११५ च्या महिला शाखा अध्यक्षा सौ तेजस्वी बने, शिवसैनिक श्री राजेश फडतरे तसेच विभागातील समस्त महिला व पुरुष शिवसैनिक उपस्थित होते.

# मौजपुरी येथील १०१ वर्षाची भंडाऱ्याची परंपरा कायम

## मौजपुरी येथे २५ हजार भाविकांनी घेतला महाप्रसाद



**रामनगर । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील मौजपुरी येथील जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाणारे श्री क्षेत्र रामेश्वर मंदिरात भावीकांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

शिवरात्रीच्या तिसर्या दिवशी उंबरदोंड्या व वरण पोळीचा महाप्रसाद असतो. हा प्रसाद घेण्यासाठी सकाळी ११ वाजेपासुन भावीकांनी मंदीराच्या प्रांगणात गर्दी केली होती. भंडाऱ्याच्या दिवशी ५१ क्विंटल पोळ्या व उंबरधोंड्याची भाजी चा प्रसाद करण्यात आला होता. रामेश्वर महादेव मंदिर जागृत देवस्थान आहे या ठिकाणी श्रावण महिन्यात दररोज महिना भर भंडारा असतो श्री शिवयोगी स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त महाशिवरात्रीच्या मोठा भंडारा होतो . गुढीपाडव्याला येथे मोठी यात्रा भरते तसेच बारा गाड्या कार्यक्रम नवस फेडण्यासाठी बाहेरगावी गेलेले भाविक आवर्जून येतात व अम्लीचाही कार्यक्रम असतो. पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी कुस्त्यांची भव्य दंगल असते.

रामेश्वरी संस्थान मौजपुरी हे जालना जिल्ह्यातील एक सुप्रसिध्द असे ठिकाण आहे येथे श्री प्रभु श्रीराम जेव्हा वनवासाला गेले होते तेव्हा ते या मार्गे गेले होते व त्यांनीच येथे भगवान शंकराची स्थापना करून पुजा केली होती तेव्हापासुन येथे हजारो वर्षापासुन भगवान शंकराची मुर्ती स्थापित आहे. सात दिवसापासुन मौजपुरी येथे अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. याठिकाणी धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल असते.दररोज किर्तन श्रवणासाठी परिसराती भाविकांची उपस्थिती होती.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**




**क्रीडा व युवक सेवा जिल्हा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने संडे ऑन सायकल फिटनेस का डोस या आधा घंटा रोज सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे क्रीडा अधिकारी आरती चिल्लारे क्रीडा मार्गदर्शक सिद्धार्थ कदम राहुल गायके हरून खान विजय आगळे व इतर दिसत आहे (छायाचित्र - किरण खानापुरे)**

# 'क्रीडा महाकुंभ' स्पर्धेचे आयोजन

**मुंबई -** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्ष आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधत पारंपरिक खेळांना प्रोत्साहन देण्याचे उद्देशाने कौशल्य विकास, रोजगार आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून ' क्रीडा महाकुंभ स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले आहे. येत्या २ ते ९ मार्चपर्यंत हा क्रीडा महाकुंभ राज्यात सुरू राहणार आहे.

या क्रीडा महाकुंभात कब्बडी आणि खो-खो या जागतिक दर्जाच्या खेळांबरोबर लगोरी, लेझिम, लंगडी, विटी दांडू यांसह १२ पारंपरिक खेळांचा समावेश करण्यात आला आहे. २ आणि ३ मार्च रोजी आय टी आय स्तरावर, ४ आणि ५ मार्च रोजी जिल्हास्तरावर तर ७ ते ९ मार्च पर्यंत नाशिक विभागीय स्तरावर या क्रीडा कुंभाची सांगता होईल. विजेत्यांना आकर्षक पारितोषिक तर सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी एक क्यूआर कोड स्कॅन करावा लागणार आहे. तसेच इच्छुक खेळाडूंनी क्रीडा कुंभसाठी नियुक्त केलेले प्रभारी किंवा संबंधित आय.टी.आयच्या मुख्याध्यापकांकडे नोंदणी करायची आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नाममात्र १० रुपये प्रवेश शुल्क आकारण्यात आले असून ते रिफंड अर्थात पुन्हा स्पर्धकांना परत देण्यात येणार आहे. गुंफुनी स्वदेशी खेळाची माळजोडूया भारतीय संस्कृतीशी नाळ हे ब्रीद वाक्य घेऊन मंत्री श्री.लोढा यांच्या पुढाकाराने या अभिनव स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. तन आणि मन जोडून जागतिक स्तरावर दर्जेदार खेळाडू घडवण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१८ साली देशभरात 'खेलो इंडिया' ही संकल्पना राबवली. या संकल्पनेच्या आधारावर आखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने देशभरात 'खेलो भारत' ही क्रीडा मोहीम सुरू केली आहे.

# ए टू झेड इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील इन्कम टॅक्स कॉलनीतील ए टू झेड इंग्लिश स्कूलचे २१ वे वार्षिक स्नेहसंमेलन एम. एस. जैन इंग्लिश स्कूलच्या सभागृहात उत्साहात पार पडले.

यास्नेहसंमेलनाचे उद्घाटन सौ. सीमाताई खोतकर यांच्याहस्ते झाले, अध्यक्षस्थानी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील होते. व्यासपीठावर सौ. संगीता गादिया, शाळेचे संचालक सुरेंद्र मुनोत, संचालिका सौ. सीमा मुनोत यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सौ सीमाताई खोतकर आणि डॉ. राजेंद्र पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करून स्नेहसंमेलना शुभेच्छा दिल्या. स्नेहसंमेलनाची 'पंचतत्व' ही थीम होती. प्ले ग्रुप ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी या संकल्पनेवर आधारित नृत्याविष्कार सादर करत उपस्थितांची मने जिंकली व आपल्या बहारदार कलाविष्काराने उपस्थित मान्यवर आणि पालकांना मंत्रमुग्ध केले. शेवटी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

प्रास्ताविक भाषणात संचालिका सौ. सीमा मुनोत म्हणाल्या की, शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जातात. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना एकत्र आणणारा हा कार्यक्रम एक प्रकारे शाळेचा उत्सव असतो आणि शालेय जीवनातील एक महत्त्वाचा अनुभव असतो, जो विद्यार्थ्यांना अभ्यासापलीकडील जग समजून घेण्यास मदत करतो, असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दर्शन मुनोत, सुरभी मुनोत -कोटेचा व शाळेच्या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला पालक व परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# माणगाव नगरपंचायत व ग्रामपंचायत गोरेगाव येथे महास्वच्छता अभियान; २७३४ सदस्यांचा सहभाग





**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** जेष्ठ निरुपणकार महाराष्ट्र भूषण ति. डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्म शताब्दी निमित्ताने रविवार दिनांक २ मार्च २०२५ रोजी ति. डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने ति. डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी, ति. डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाने देशभरात महास्वच्छता अभियान मोहिमेला सुरुवात करण्यात आली. धर्माधिकारी यांची कर्मभूमी असलेल्या रायगड जिल्हयासह महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यातून रविवारी सकाळी ९.०० वाजता या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

हजारो श्री सदस्य प्रत्येक गाव, खेडयात व शहरात ठिकठिकाणी जाऊन स्वच्छता करताना पाहायला मिळाले. माणगांव नगरपंचायत व ग्रुप ग्राम पंचायत गोरेगांव येथे महास्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

माणगाव शहरात या स्वच्छता अभियानामध्ये १५२० श्रीसदस्यांनी सहभाग घेतला. माणगावमधील तहसिल कार्यालय परिसर, प्रांत कार्यालय, पोलिस स्टेशन, कचेरी रोड, बाजारपेठ, मुंबई गोवा हायवे, निजामपूर रोड, उपजिल्हा रुग्णालय, मोर्बा रोड, जिल्हापरिषद शाळा, बस स्थानक, रेल्वे स्थानक परिसर, महाराण प्रताप नगर रस्ता, पंचायत समिती, स्मशान भूमी आणि मच्छी मार्केट परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. श्रीसदस्यांनी स्वयंस्फूर्तीने आणि शिस्तबद्ध पद्धतीने रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले गवत, कचरा व प्लास्टिक बाटल्या उचलून परिसर स्वच्छ केला. तसेच गटारामधील ओला कचरा सुद्धा स्वच्छ करण्यात आले. यासाठी एकूण २२ वाहनांचा वापर करुन २८ टन ओला आणि ४४ टन सुका असा एकूण ७२ टन कचरा उचलण्यात आला. माणगांव नगरपंचायतीचे नगरसेवक नितीन वाढवळ, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी उपनगराध्यक्ष संदीप खरंगटे, माजी नायब तहसिलदार सुरेश वाढवळ, नगरपंचायत स्वच्छता प्रमुख अतुल जाधव व प्रांत कार्यालय महसुल सहाय्यक दिनेश पाचाडकर तसेच इतर संघटनांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

तसेच ग्रुपग्रामपंचायत गोरेगाव हद्दीत १२१४ श्रीसदस्यांनी सहभाग घेतला. या स्वच्छता अभियानामध्ये ग्रुप ग्रामपंचायत गोरेगावचे प्रांगण, गोरेगाव पोलिस स्टेशनचा परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र, गोरेगाव बस स्थानक, विष्णू तलाव गोरेगाव, गाव तलाव गोरेगाव, रायगड जिल्हा परिषद उर्दू शाळा, रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा, ए. के. आय. हायस्कूल, बौध्द विहार, मस्जिद आणि स्मशानभूमीतील परिसर स्वच्छता करण्यात आली. यासाठी एकूण १० वाहनांचा वापर करुन १४ टन ओला आणि २४ टन सुका असा एकूण ३८ टन कचरा उचलण्यात आला. यावेळी गोरेगांव ग्राम पंचायत सरपंच जुब्बेर अब्बासी व इतर मान्यवर उपस्थित होते. माणगांव नगरपंचायत व ग्रामपंचायत गोरेगांव महा स्वच्छता अभियान यशस्वी करण्याकरिता एकूण २७३४ श्रीसदस्य सहभागी झाले होते. एकूण दोन्ही मिळून ४२ टन ओला कचरा व ६८ टन सुका कचरा उचलण्यात आला.

# सिद्धार्थ महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

मराठी साहित्यातील ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी विष्णू वामन शिरवाडकर(कुसुमाग्रज) यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विनोद हिवराळे हे होते तर प्रमुख वक्ते प्रा.डॉ. शिवाजी जगतवाड हे होते. व्यासपीठावर महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ.अशोक पठाडे व प्रा. मनीष बनकर यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.र.तु.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रा.डॉ.शिवाजी जगतवाड यांनी आपले विचार व्यक्त करतांना नव्या पिढीची मराठीची नाळ तुटू नये यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिले पाहिजे. त्याचबरोबर भाषा ही ओठातून येण्यापेक्षा ती पोटातून येणे गरजेचे आहे, माय मराठीचा जयजयकार करतांना आपल्यातली मराठीपणाची ज्योत तेवत




ठेवणे महत्त्वाचे आहे. केवळ दिखाऊपणासाठी मराठीचे प्रेम नको अंतरीक जाणिवेतून ते प्रकट होत राहिले तर भाषा आणि संस्कृती कधीच मरत नाही. असे विचार त्यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर विज्ञान दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्रा. मनीष बनकर यांनी सी.व्ही. रमण यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विनोद हिवराळे यांनी मातृभाषेवर बोलतांना नव्या पिढीचे भाषा प्रेम, साहित्य प्रेम आणि वाचन प्रेम नव्या पद्धतीने व्यक्त होत असेल तर त्याचा आपण स्वीकार केला पाहिजे. त्याचबरोबर आजचे युग हे तंत्रज्ञानाचे आहे या युगात आपली भाषा ही तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कशी सशक्त होईल अधिक लोकांपर्यंत कशी जाईल या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिल वैद्य यांनी केले तर आभार ग्रंथपाल डॉ. अशोक पठाडे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू त्याचबरोबर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सांगता ही राष्ट्रगीताने झाली.

# तर राजीनामा मागू - फडणवीस

**मुंबई -** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाचा तपास एसआयटी, सीआयडी आणि न्यायालयीन समितीकडून चौकशी सुरु आहे. या प्रकरणात आता राज्य गुन्हा अन्वेषण विभागाने दोषारोपपत्र सादर केलं. यामध्ये वाल्मिक कराड हाच हत्येच्या प्रकरणात मुख्य सूत्रधार असल्याची माहिती समोर आली. दरम्यान, मंत्री धनंजय मुंडे यांचा वाल्मिक कराड हा निकटवर्तीय असल्याचा आरोप केला जातो. यावरून धनंजय मुंडे यांचा राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधक करत आहेत. दुसरीकडे कृषीमंत्री ड.माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने दोन वर्षाच्या कारावासाची शिक्षा सुनावल्याप्रकरणी त्यांचाही राजीनामा घेतला जावा, अशी मागणी विरोधक करत आहेत. दरम्यान, या घटनेच्या संदर्भात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचक पण थेट इशारा देणारं विधान केलं. 'नैतिकतेचं अध:पतन झालं आहे असं वाटल्यास आम्ही थेट राजीनामा मागू', असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या अध्यक्षपदी ॲड शिवाजीराव आदमाने तर सचिवपदी डॉ. कुमठेकर

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात गेल्या४७ वर्षापासून सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ सामाजिक नेते ड. शिवाजीराव आदमाने तर सचिवपदी लेखक व विचारवंत प्रा. डॉ. विजय कुमठेकर यांची निवड करण्यात आली आहे.

सन २०२५ च्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेची नूतन कार्यकारिणी निवडण्यासाठी रविवार दिनांक २ मार्च २०२५ रोजी दुपारी १ वाजता जालना शहरातील अंबड चौफुलीवरील शासकीय विश्रामगृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ सामाजिक नेते ड. ब्रम्हानंद चव्हाण हे या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीत सर्वानुमते अध्यक्षपदी ड. शिवाजीराव आदमाने तर सचिवपदी प्रा. डॉ. विजय कुमठेकर यांची निवड करण्यात आली.

या बैठकीस ज्येष्ठ सामाजिक नेते ड. बी. एम. साळवे, गणेशराव रत्नपारखे, सुधाकरराव रत्नपारखे, सुदामराव सदाशिवे, सुभाष गाडगे, मिलिंद धनेधर, बबनराव रत्नपारखे, अशोक रगडे,सुनील साळवे, प्रमोदकुमार रत्नपारखे, सुधाकर निकाळजे , रोहिदास गंगातिवरे, व्याख्यानमालेचे मावळते अध्यक्ष आण्णासाहेब चित्तेकर,सचिव संजय हेरकर, सुधाकर रतनराव रत्नपारखे, राजू मोरे, प्रभाकर घेवंदे, शिवाजी तायडे, संदीप खरात, कपिल खरात, सतीश वाहुळे,सचिन कांबळे, राहुल रत्नपारखे, पप्पू चत्रे,भरत मानकर, ड. सिध्दार्थ चव्हाण, ड. महेंद्र साळवे, सुहास साळवे, अमोल खरात, राजू गवई, भास्कर साळवे, भरत मानकर, सुभाष बोर्डे, विजय पैठणे,अनिल रत्नपारखे, संजय वेव्हल,ड.विनोद डिगे,अमित साळवे, अशोक लबडे, शेख अख्तर, दत्तू अंभोरे, राज रत्नपारखे, विलास रत्नपारखे, यश रत्नपारखे, प्रमोद म्हसके, भारती हेरकर,सुलेखा मनवर,अनुराधा हेरकर, लता सोनवणे यांची उपस्थिती होती.



जालना शहरात गेल्या ४७ वर्षापासून सुरू असलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला बहुजन समाजाला प्रबोधन व दिशा देण्याचे कार्य करीत आहे. या व्याख्यानमालेत प्रसिद्ध अशा विचारवंत, लेखकांनी आपले विचार मांडले आहेत.

## राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत ‘आम्ही तंत्रस्नेही विद्यार्थी’ उपक्रम

# सातवा तंत्रस्नेही शिक्षक म्हणून शेख यांची राज्यभरात ओळख

**पुणे । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संशोधन विभागामार्फत पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक तसेच विशेष सहायक व साधनव्यक्ती, पर्यवेक्षीय अधिकारी या गटांसाठी २०२४-२५ वर्षासाठी राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल आणि पारितोषिक समारंभ नुकताच संपन्न झाला असून सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षक खुशालद्दीन उस्मान शेख यांच्या आम्ही तंत्रस्नेही विद्यार्थी या उपक्रमास प्राथमिक शिक्षक गटातून सातवा क्रमांक प्राप्त झाला आहे. त्याबद्दल त्यांचे अनिता पाटील, किरणकुमार इंगळे, फरीद शेख, संगीता देसाई, गंगाधर वानोळे यांच्यासह महाराष्ट्रभरातून अनेकांनी अभिनंदन केले आहे.



खुशालद्दीन शेख हे दर सोमवारी वर्षभर मोफत ५२ ऑनलाईन कार्यशाळा घेत राज्यभरातील शिक्षकांना तंत्रस्नेही करीत असून आजपर्यंत हजारो शिक्षकांनी या कार्यशाळेचा आजपर्यंत लाभ घेतला आहे. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देत असतानाच त्यांनी हजारो वृक्षांचे रोपण करून उत्तम संगोपनही केले आहे. त्यांच्या कार्यशाळेत चित्र, कोडींग, कार्टून, पीडीएफ शूट, मोरपंखाने लिहिणारे, सेल्फ टीचिंग, पीपीटी, बोलकी चित्रे, ई चाचणी आदी प्रकारांचे व्हिडिओ निर्मिती त्याचबरोबर ई-मेल आयडी, प्रश्नपत्रिकांसाठी वर्ड, एक्सलचा प्रभावी वापर, विद्यार्थ्यांच्या लॉकर, गुगल ड्राईव्ह बाबत सविस्तर मार्गदर्शन केले जात असून जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण स्मार्ट पद्धतीने

> दर सोमवारी सायं ८ ते ९.३० या वेळेत ऑनलाईन मोफत कार्यशाळेचा मी लाभार्थी असून सोलापूरचे राज्यस्तरीय तंत्रस्नेही शिक्षक खुशालद्दीन उस्मान शेख हे विनामूल्य मार्गदर्शन करीत आहेत.याशिवाय ते उपयुक्त अशा तंत्रस्नेही क्लृप्त्याही देत आहेत. त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी तळमळीचे असून याचा माझ्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी फायदा होत आहे.
>
> **गंगाधर वानोळे,**
> **जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटोदा ता. मंठा**

ज्ञानाचे दृढीकरण करण्यासाठी युट्युब चॅनेल निर्मिती, विविध शिष्यवृत्ती, स्टुडन्ट पोर्टल, ब्लॉग निर्मिती, ऑनलाइन चाचणी व पच्या साहाय्याने तपासणी, शाळा मूल्यांकन, डीजी देण्याच्या सोप्या पद्धतीसुद्धा शिक्षकांना देण्यात येत आहेत. याशिवाय ते पर्यावरण संवर्धनसाठीही वटवृक्ष लावणाऱ्या शिक्षकांसाठी मोफत कार्यशाळा घेऊन घेऊन अनेकांना प्रेरित करीत आहेत.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.